# फिर्याद

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार,
कॅम्प पोलीस ठाणे अक्कलकुवा
दि. १०/११/२०२१

माझे नाव अविनाश दित्या पाडवी, वय–२७ वर्षे, व्यवसाय–शेती रा. इटवाई ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार

मी समक्ष फिर्याद देतो की, मी दि. ०९/११/२०२१ रोजी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा गावीत रा. नवापूर जि. नंदुरबार यांना भेटून माझे बाबतीत हकिकत सांगीतले की, मी वरील ठिकाणी रहात असुन वडीलोपार्जीत शेती करुन उदरनिर्वाह करतो. माझे वडिल दित्या काथू पाडवी हे आजारी असल्यामुळे एप्रिल महिन्यात वारले. त्यानंतर सदर शेती आई सुकीबाई दित्या पाडवी हिच्या नावावर होणेकामी प्रस्ताव केलेला आहे. माझ्या आईच्या नावे इटवाई ता. अक्कलकुवा शिवारात सुमारे एक एकर शेती असून त्या शेतात रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड करणेकामी पंचायत समिती, अक्कलकुवा येथे माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये अर्ज केला होता. सदर योजना ही तीन वर्षे पावेतोची असून तीन वर्षात अंदाजे ४०,०००/– रू. मिळणार आहेत.

रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड करण्याचे काम पाहणारे पंचायत समिती, अक्कलकुवा येथील तांत्रिक सहायक अधिकारी श्री. अभिषेक गोपीचंद नुक्ते हे पाहतात. माझे शेताच्या बांधावर या योजनेंतर्गत वृक्ष लागवड केली असून त्या वृक्ष लागवडीस लागलेला मजुरांचा खर्चाचे मस्टर बील श्री. नुक्ते यांनी तयार करून मला पहिला हप्ता २९७६/–रू. मजुरांच्या खात्यांवर टाकून दिला होता. माझे बील काढून दिल्याच्या मोबदल्यात श्री.नुक्ते हे वारंवार माझेकडेस ५००/–रू. लाचेची मागणी करीत होते. अशी सर्व हकिगत सांगितली. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा गावीत रा. नवापूर जि. नंदुरबार यांनी काल दिनांक ०९/११/२०२१ रोजी लगेच अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील कर्मचारी महाजन यांना फोन करून रोजगार हमी योजना बाबत सविस्तर हकीकत सांगुन, आपण उदईक दिनांक १०/११/२०२१ रोजी कारवाई साठी अक्कलकुवा येथे यावे बाबत कळविले.

त्याप्रमाणे आज दिनांक १०/११/२०२१ रोजी सकाळी सुमारे १०.०० वाजता अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो नंदुरबार चे कर्मचारी पोह/महाजन व आपल्या स्टाफसह अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालय येथे येवुन सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा गावीत यांना फोन केला त्यावेळी मी सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा गावीत असे सोबत अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालय येथे आलो. त्यावेळी आपण मला आपला स्टाफ व दोन्ही पंच अशांची ओळख करुन दिली. आपण पंचासमक्ष मला माझे तक्रारीविषयी विचारपुस केली असता मी वरीलप्रमाणे लाच मागणी बाबत हकिकत सांगितलेली आहे.

त्यानंतर मी पंचायत समिती अक्कलकुवा येथील अधिकारी श्री. अभिषेक नुक्ते यांना भेटण्यासाठी जाणार आहे. ते मागत असलेले पैसे ही कोणतीही फी अगर शासकीय देणे नसुन ते मागत असलेली रक्कम ही लाचच आहे अशी माझी खात्री झाली आहे. त्यांना लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. माझे व तांत्रिक अधिकारी श्री. अभिषेक नुक्ते यांच्याशी कोणतेही पुर्ववैमनस्य किंवा कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचा अगर उधार उसणवारीचा व्यवहार नाही. तरी माझ्याकडून लाच मागणारे तांत्रिक अधिकारी श्री. अभिषेक नुक्ते यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही नम्र विनंती आहे. अशी लेखी तक्रार पंचांसमक्ष दिली होती.

त्यांनतर दोन्ही पंचांना मी लिहुन दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यावेळी मी सांगीतलेली तोंडी हकीकत व लेखी तक्रार सारखी असल्याने सदर तक्रारीवर दोन्ही पंच व पोनि/वाघ अशांनी सहया केल्या होत्या. त्यानंतर ठरल्याप्रमाणे पुढील कारवाई करण्याचे ठरविले होते.

Scanned with CamScanner

पोनि/वाघ साहेब यांनी सांगीतले की, लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व सॅनडिस्क मायक्रो एस. डी.–१६ जी.बी.चे एक सीलबंद मेमरी कार्ड बाहेर काढून दोन्ही पंच व माझे समक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते, याची सविस्तर माहिती पोनि/वाघ यांनी मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डीग नसल्याची दोन्ही पंचांनी खात्री केली. त्यानंतर पोनि/वाघ यांनी वरील मेमरीकार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून मेमरीकार्डमध्ये देखील पूर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची दोन्ही पंचांची व माझी खात्री करुन दिली.

पोनि/वाघ यांनी मला व पंच नं. १ वाडेकर यांना पडताळणी पंचनामाकामी योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतील बाजुस लावून ते सुरु केले, ती वेळ ११:१० वाजेची होती. त्यानंतर मला तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांची भेट घेण्यासाठी पंच नं.१ यांचेसह माझे ताब्यातील खाजगी मोटार सायकलीने जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा येथुन पंचायत समिती, अक्कलकुवा येथे रवाना केले असता त्याठिकाणी तांत्रिक सहा. अभिषेक नुक्ते हे भेटले. त्यावेळी आंमचेत वृक्ष लागवडीचे बिलाचे मस्टर बाबत चर्चा झाली. त्यानंतर काही वेळाने मी व पंच क्र. १ श्री. वाडेकर असे जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा येथे थांबुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर पोनि/वाघ साहेबांनी शासकीय वाहनात बसुन माझे शर्टाचे आतील बाजुस लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांच्या ताब्यात घेतले ती वेळ ११.२९ वाजेची होती.

त्यानंतर आपण पंच नं.१ श्री. वाडेकर यांना पंच नं.२ श्री. हेडगे यांचेसमक्ष विचारले की,"आपणास व तक्रारदार अशांना तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांची भेट घेण्यासाठी येथून रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं.१ यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे ताब्यातील मोटार सायकलीने तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांची भेट घेण्याकरीता पंचायत समिती, अक्कलकुवा येथे गेलो असता त्यावेळी तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते हे पंचायत समिती कार्यालयाचे बाहेर उभे होते. त्यांनी मला गेटला लागुन असलेल्या चहाच्या दुकानात ईशारा करुन बोलविले त्या चहाच्या दुकानात माझेत व त्यांचेत कामासंबंधाने बोलणी झाली. त्यावेळी तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांनी माझे वृक्ष लागवडीचे मस्टर बिलाचे २९७६/– रुपयाचे बिल काढुन दिल्याचे मोबदल्यात माझेकडुन पाचशे रुपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर माझेत व तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण झाले असुन सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण हे आपण, पंच नं.१ श्री. वाडेकर व पंच नं.२ श्री. हेडगे यांचेसमक्ष खाजगी वाहनात आपण सर्वानी ऐकले. सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषणात माझे व तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांचेत बोलणे झाले असून त्यात माझे वृक्ष लागवडीचे मस्टर बिलाचे २९७६/– रुपयाचे बिल काढुन दिल्याचे मोबदल्यात त्यांनी माझेकडुन पाचशे रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेबाबत सर्वाची खात्री झाली होती.

त्यानतंर वरप्रमाणे नमूद संभाषणाची आपल्या सुचनेवरून स्क्रिप्ट पोना/मराठे यांनी माझे व पंच नं. १ श्री. वाडेकर यांचे मदतीने जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा चे गेट समोर खाजगी वाहनात तयार केली.

त्यानंतर आपण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले वर नमुद संभाषणाचे लॅपटॉपव्दारे हॅशव्हॅल्यु काढुन सदर हॅशव्हॅल्यु प्रमाणपत्राची प्रिन्ट अक्कलकुवा पोलीस ठाणे येथकाढली. सदर प्रमाणपत्रावर आपण व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्ड काढुन सदर मेमरीकार्ड एका प्लास्टिकच्या कव्हरसह एका खाकी पाकीटात घालुन त्यावर "तक्रारदार अविनाश पाडवी व तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांचेतील दि.

Apadvi

Scanned with CamScanner

१०/११/२०२१ रोजीचे पडताळणी दरम्यानचे संभाषण'' असे वर्णन असलेले पांढऱ्या कागदाचे लेबल लावून त्यावर दोन्ही पंच व आपण सहया करून खाकी पाकीट कार्यालयीन सीलने लाखेने सिलबंद करण्यांत आले ते पोनि/वाघ यांनी ताब्यात घेतले. तसा सविस्तर पंचनामा कार्यालयात करण्यात आला होता.

त्यानंतर अभिषेक नुक्ते यांना बाहेरगावी जावयाचे असल्याने लागलीच यशस्वी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरल्याने मी माझे शेतीच्या बचतीतून आणलेले एकूण ५००/– रूपये आपल्यासमोर हजर केले. त्यात ५००/–रु. दराची एक नोट होती. सदर नोटेस आपल्या सूचनेवरुन पोना/अहीरे यांनी बॅगेतून एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा/टॉर्च काढून आमचे समोर ठेवला. तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हायोलेट दिवा आणि सिलबंद पाकीटात अॅंथ्रासिन पावडरची बाटली असल्याबाबत पोनि/वाघ यांनी त्यांचे गुणधर्म व वैशिष्ट्याबाबत सांगितले. त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाशात आणि त्यानंतर आपण खाजगी वाहनाचे काचा व दरवाजा बंद करुन वाहनांवर काळा कपडा टाकुन कृत्रीम अंधार करुन त्या अधारात अ. व्हा.दिव्याचे प्रकाशात आपले आम्हां दोन्ही पंचांचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात व कपडे व मी लाच देणेकामी हजर केलेली ५०० रूपये दराची एक चलनी नोट तपासली. सर्व काही नैसर्गिक नेहमीप्रमाणे दिसून आले. त्यानंतर वाहनामध्ये पूर्ववत उजेड करण्यात आला.

वरील नोटेस पोना/मनोज अहीरे यांनी त्या बाटलीचे झाकण उघडून त्या बाटलीतील अ.पा. कापसाच्या बोळयाने एका पांढरे कागदावर दोन्ही बाजूने क्रॉस आकाराने लावली सदर नोटा खाजगी वाहनाच्या काचा व दरवाजा बंद करून काळा कपडा टाकुन कृत्रिम अंधार करून अ.वा.दिवा/टॉर्चने प्रकाश टाकून तपासले असता सदर नोटांवर फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर पोना/मनोज अहीरे यांनी सदर नोट माझे पॅन्टचे पुढील उजवे बाजुस असलेल्या खिशात ठेवली. त्यानंतर पोना/मनोज अहीरे यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. त्याबाबतचा पंचनामा गाडीत सापळापुर्व पंचनामा करण्यात आला होता.

त्यानंतर आपण यशस्वी सापळा कारवाईकामी मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या पुन्हा सूचना दिल्या. त्यानंतर आपण आपलेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये आम्हां पंचासमक्ष नवीन १६ जी. बी.चे कोरे मेमरीकार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टाच्या आतील बाजूने लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ १२.०९ वाजेची होती.

त्यानंतर मला व पंच नं. १ श्री. वाडेकर यांना नियोजनाप्रमाणे जवाहर नवोदय विद्यालय, अक्कलकुवा येथुन लाचेची रक्कम देणेकामी माझे ताब्यातील मोटारसायकलीने पंचायत समिती अक्कलकुवा येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/वाघ, पंच नं.२ श्री. हेडगे तसेच स्टाफ असे थोडया अंतराने खाजगी वाहन क्रमांक एम.एच. ३९/जे. १०४४ व जी.जे. २६ एच. ८१७१ या खाजगी वाहनाने रवाना होवून पंचायत समिती, अक्कलकुवा चे कार्यालयात आडोशाला दबा धरुन थांबुन होते.

त्यानंतर थोडयाच वेळात मी व तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांना पंचायत समिती अक्कलकुवा येथील रेकॉर्ड रुमजवळ भेटलो व कामासंदर्भाने चर्चा केली. त्यावेळी तांत्रिक सहा. अधिकारी अभिषेक नुक्ते यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम माझे पॅन्टचे खिश्यातुन काढुन त्याचे समोर धरली असता त्यांनी ती स्विकारुन त्यांचे शर्टाचे डाव्या खिश्यांत ठेवली. त्यावेळी मी लाच देण्यांचा पुर्वनियोजीत इशारा केल्याने सापळा पथकातील अधिकारी व स्टाफ व दोन्ही पंच हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणीच आडोशाला उभे असल्याने सक्रीय होवुन आमचे जवळ आले. त्यावेळेस पोह/ठाकरे व पोना/मराठे अशांनी दोन्ही हात मनगटापासुन घट्ट पकडून ठेवले. त्यादरम्यान पोना/मराठे यांनी माझे शर्टाचे आतील बाजूस लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून आपल्या ताब्यात ठेवले ती वेळ १२.१६ वाजेची होती. मला कार्यालयाचे बाहेरे थांबण्यांस सांगितले.

Ahadvi

Scanned with CamScanner

त्यानंतर आपण पोलीस ठाणे अक्कलकुवा येथे आपली संपुर्ण कारवाई करून तसा सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि. १०/११/२०२१ रोजी अभिषेक गोपीचंद नुक्ते, वय ३३, व्यवसाय– नोकरी, तांत्रिक सहा. अधिकारी (कंत्राटी), रोजगार हमी योजना, पंचायत समिती, अक्कलकुवा जि. नंदुरबार रा. प्लॉट नं. ६८, मदन मोहन नगर, सि.बी. गार्डन जवळ, वाघेदा रोड, नंदुरबार जि. नंदुरबार यांनी माझेकडुन माझे शेताच्या बांधवार रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड केली असून त्या वृक्ष लागवडीस लागलेला मजुरांचा खर्चाचे मस्टर बील श्री. नुक्ते यांनी तयार करून मला पहिला हप्ता २९७६/–रू. मजुरांच्या खात्यांवर टाकून दिला होता. माझे बील काढून दिल्याच्या मोबदल्यात श्री. नुक्ते हे वारंवार माझेकडे ५००/–रू. लाचेची मागणी करीत होते, तरी मागणी केलेली लाचेची रक्कम आज रोजी पंच साक्षीदारासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तरी यातील अभिषेक गोपीचंद नुक्ते, वय ३३, व्यवसाय– नोकरी, तांत्रिक सहा. अधिकारी (कंत्राटी), रोजगार हमी योजना, पंचायत समिती, अक्कलकुवा जि. नंदुरबार रा. प्लॉट नं. ६८, मदन मोहन नगर, सि.बी. गार्डन जवळ, वाघोदा रोड, नंदुरबार जि. नंदुरबार यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन लाचेची मागणी करुन ती लाच स्विकारली. म्हणून माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगनेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केली आहे.

समक्ष

Swagh

(समाधान एम.वाघ)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,नंदुरबार

हि फिर्याद दिली सही,
दिनांक– १०/११/२०२१

[signature]
अविनाश दिसा पाडवी

Scanned with CamScanner

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** अक्कलकुवा **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0699 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/11/2021 20:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 10/11/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/11/2021
**Time From (वेळेपासून):** 12:09 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/11/2021 **Time (वेळ):** 19:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 021 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/11/2021 19:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** panchayat samiti office,akkalkuwa

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** avinash gutya padvi

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ईटवाई,अक्कलकुवा,अक्कलकुवा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ईटवाई,अक्कलकुवा,अक्कलकुवा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9579251085

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | abhishek gopichand nukte | | | 1. पंचायत समिती कार्यालय ,अक्कलकुवा, अक्कलकुवा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | श्री. नुक्ते हे वारवार माझेकडे 500/रू. लाचेची मागणी करीत होते | 500.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | 00रुपये किमतीचा एक पांढऱ्या रंगाचा फुल बाहीचा शर्ट शर्टावर बारीक चौकटीचे काळ्या रंगाची डीझाईन असलेला | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 500.00

11 **Inquest Report / U.D. case No., If any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

माझे नाव अविनाष दित्या पाडवी, वय-27 वर्शे, व्यवसाय-षेती रा. इटवाई ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार मी समक्ष फिर्याद देतो की, मी दि. 09/11/2021 रोजी सामाजिक कार्यकत्र्या श्रीमती पुश्पा गावीत रा. नवापूर जि. नंदुरबार यांना भेटून माझे बाबतीत हकिकत सांगीतले की, मी वरील ठिकाणी रहात असुन वडीलोपार्जीत शेती करुन उदरनिर्वाह करतो. माझे वडिल दित्या काथू पाडवी हे आजारी असल्यामुळे एप्रिल महिन्यात वारले. त्यानंतर सदर षेती आई सुकीबाई दित्या पाडवी हिच्या नावावर होणेकामी प्रस्ताव केलेला आहे. माझ्या आईच्या नावे इटवाई ता. अक्कलकुवा षिवारात सुमारे एक एकर षेती असून त्या षेतात रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड करणेकामी पंचायत समिती, अक्कलकुवा येथे माहे आक्टोबर 2021 मध्ये अर्ज केला होता. सदर योजना ही तीन वर्शे पावेतोची असून तीन वर्शात अंदाजे 40,000/- रू. मिळणार आहेत. रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्ष लागवड करण्याचे काम पाहणारे पंचायत समिती, अक्कलकुवा येथील तांत्रिक सहायक अधिकारी श्री. अभिशेक गोपीचंद नुक्ते हे पाहतात. माझे षेताच्या बांधावर या योजनेंतर्गत वृक्ष लागवड केली असून त्या वृक्ष लागवडीस लागलेला मजुरांचा खर्चाचे मस्टर बील श्री. नुक्ते यांनी तयार करून मला पहिला हप्ता 2976/-रू. मजुरांच्या खात्यांवर टाकून दिला होता. माझे बील काढून दिल्याच्या मोबदल्यात श्री.नुक्ते हे वारंवार माझेकडेस 500/-रू. लाचेची मागणी करीत होते. अशी सर्व हकिगत सांगितली. त्यानंतर सामाजिक कार्यकत्र्या श्रीमती पुश्पा गावीत रा. नवापूर जि. नंदुरबार यांनी काल दिनांक 09/11/2021 रोजी लगेच अन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार येथील कर्मचारी महाजन यांना फोन करून रोजगार हमी योजना बाबत सविस्तर हकीकत सांगुन, आपण उदईक दिनांक 10/11/2021 रोजी कारवाई साठी अक्कलकुवा येथे यावे बाबत कळविले. त्याप्रमाणे आज दिनांक 10/11/2021 रोजी सकाळी सुमारे 10.00 वाजता अन्टी करप्शन ब्युरो नंदुरबार चे कर्मचारी पोह/महाजन व आपल्या स्टाफसह अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालय येथे येवुन सामाजिक कार्यकत्र्या श्रीमती पुश्पा गावीत यांना फोन केला त्यावेळी मी सामाजिक कार्यकत्र्या श्रीमती पुश्पा गावीत असे सोबत अक्कलकुवा जवाहर नवोदय विद्यालय येथे आलो. त्यावेळी आपण मला आपला स्टाफ व दोन्ही पंच अशांची ओळख करुन दिली. आपण पंचासमक्ष मला माझे तक्रारीविषयी विचारपुस केली असता मी वरीलप्रमाणे लाच मागणी बाबत हकिकत सांगितलेली आहे.त्यानंतर मी पंचायत समिती अक्कलकुवा येथील अधिकारी श्री. अभिशेक नुक्ते यांना भेटण्यासाठी जाणार आहे. ते मागत असलेले पैसे ही कोणतीही फी अगर षासकीय देणे नसुन ते मागत असलेली रक्कम ही लाचच आहे अषी माझी खात्री झाली आहे. त्यांना लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. माझे व तांत्रिक अधिकारी श्री. अभिशेक नुक्ते यांच्याषी



Scanned with CamScanner

नंदुरबार रा. प्लाट नं. 68, मदन मोहन नगर, सि.बी. गार्डन जवळ, वाघेदा रोड, नंदुरबार जि. नंदुरबार यांनी माझेकडुन माझे शेताच्या बांधवार रोजगार हमी योजना पंचायत समिती अक्कलकुवा जि.नंदुरबार रा.प्लाट (PTO)

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) पोलिस · पोना/1130 पवार

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rajesh Narayan Shingate(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): समाधान वाघ
**Rank** (पद): पोनि
**No.**(क्र.): **to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Abedul
आबेदनारा पाडवी

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): ~~Rajesh Narayan Shingate~~ Mahesh Sajan mali
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner